मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.

वसई-विरार शहर महानगरपालिका
प्रगतीचा प्रकाश हाच बहुजन विकास
स्थापना : ३ जुलै २००९

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल: vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म. /आस्था/ ८८३/२०१८
दिनांक : ३१/१२/२०१८

-जाहिर सुचना -

**शासकीय / निमशासकीय कार्यालयातील बांधकाम पाणी पुरवठा विभागाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.**

---------------------------***---------------------------

राज्य शासकीय/निमशासकीय कार्यालयातील बांधकाम पाणी पुरवठा विभागाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता यांची वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, विरार येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. त्यासाठी इच्छुक सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, उपअभियंता व शाखा अभियंता यांचेकडून सदर पदाकरीता अर्ज दि.०५/०१/२०१९ पर्यंत मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, विरार (पुर्व) ता. वसई, जि. पालघर या पत्यावर मागविण्यात येत आहेत.

सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ व दि. २१/०२/२०१८ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार करण्यात येणार आहे. याबाबतची अधिक माहिती वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या संकेतस्थळ http://vvcmc.in वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी संकेतस्थळावरील अधिक माहिती पाहून अर्ज करावेत.

३१.१२.१८

अतिरिक्त आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

ता. वसई, जि. पालघर

**महानगरपालिकेच्या बांधकाम विभाग तसेच पाणी पुरवठा विभागाच्या कामासाठी अनुभव असलेल्या सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, उपअभियंता व शाखा अभियंता राज्य शासकीय/निमशासकीय अधिकाऱ्यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत**

**विभागाची आवश्यकता :-**

१. सदर सेवानिवृत्त अधिकारी यांस शासकीय/निमशासकीय बांधकाम/पाणीपुरवठा या कामाचा कमीत कमी तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२. मराठी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

अटी व शर्ती :-

१. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरुध्द कोणतेही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतेही शिक्षा झालेली नसावी.

२. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३. बांधकाम व पाणीपुरवठा विभागाचे पदासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असावा.

४. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७ डिसेंबर, २०१६ व दि. २१/०२/२०१८ च्या शासन निर्णयास अनुसरुन करण्यात येणार आहे.

५. अर्जदार सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६. उमेदवाराने सदर पदाकरीता अर्ज खालील नमुन्यात कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहावा अथवा टंकलेखित करावा.

७. उमेदवाराने त्यासाठी इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून सदर पदाकरीता अर्ज दिनांक ५/०१/२०१९ पर्यंत मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय, विरार (पूर्व) ता.वसई, जि.पालघर या पत्यावर पोहोचेल अशा रितीने पोस्टाने पाठवावा. अधिक माहितीसाठी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ या दुरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दाखल घेण्यात येणार नाही.

८. नियुक्ती सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात काम करावे लागेल.

९. सदर नियुक्ती एक वर्षापर्यंत राहील. आवश्यकता असल्यास नुतणीकरण करण्यात येईल.

१०. कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी शहर अभियंता वसई विरार शहर महानगरपालिका उपआयुक्त (बांधकाम/पाणीपुरवठा) यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व त्यांना वेळोवेळी कामकाजाचा अहवाल सादर करतील.

# अर्जाचा नमुना

शासकीय/निमशासकीय कार्यालयातील बांधकाम व पाणी पुरवठा विभागाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, उपअभियंता व शाखा अभियंता यांची करार पध्दतीने नियुक्ती.

| उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे. |
|---|

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :- ------------------------------------------------

२) अर्जदाराचा पत्ता :- ------------------------------------------------

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :- ------------------------------------------------

४) भ्रमणध्वनी क्रमांक :- ------------------------------------------------

५) जन्म दिनांक व वय :- ------------------------------------------------

६) शैक्षणीक अर्हता :- ------------------------------------------------

७) अनुभव :- ------------------------------------------------

८) सेवा निवृत्तीचा दिनांक :- ------------------------------------------------

९) निश्चित झालेले मुळ निवृत्तीचे वेतन :- ------------------------------------------------

१०) अंशराशिकृत मुल्य :- ------------------------------------------------

उपरोक्त पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्तीबाबतचे जाहिरात/सुचना मी काळजीपुर्वक वाचली असून सदर सूचनेतील अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी

<u>टिप :</u> **अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेची कागदपत्र, अनुभवाचा दाखला, निश्चित झालेले मुळ निवृत्ती वेतन, अंशराशीकरण याबाबतची कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे.**